सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग (भरती/पदोन्नती कक्ष)

जा.क्र.मनपा/साप्रवि-भपकक्ष/१२२/२०२५ दिनांक:- १०/०९/२०२५

परिपत्रक

प्रति,
सर्व कर्मचारी (गट-क व गट-ड)
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

विषय:- सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये कार्यरत गट-क मधून गट-क मध्ये व गट-ड मधून गट-क आणि गट-ड मधून गट-ड मध्ये पदोन्नतीने जाणाऱ्या संवर्गातील विचारक्षेत्राच्या यादीमध्ये समावेश असणारे कर्मचारी यांनी पदोन्नतीसाठी समितीच्या बैठकीकरीता आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबत.

संदर्भ:- १- नगरविकास, शासन निर्णय क्रमांक:- सांमिकु-२०२२/ प्र.क्र.८०/नवि-१९ दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजीचा मंजुर आकृतीबंध.
२- नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सांमिकु-२०२२/प्र.क्र./८१/नवि-१९ दि.३० मे २०२३ रोजीचा मंजुर सेवा (सेवाप्रवेश व सवांचे वर्गीकरण) नियम.
३- सामान्य प्रशासन विभाग क्र.एस.आर.व्ही. २०१८/प्र.क्र.१५९/का-१२, दि. ०१/०८/२०१९ रोजीचा शासन निर्णय.
४- सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन क्र. बी.सी.सी.-२०१८/प्र.क्र. ३३६/ १६-ब, दि. ०७/०५/२०२१ रोजीचा निर्णय.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मंजुर आकृतीबंधातील गट-क मधून गट-क मध्ये व गट-ड मधून गट-क आणि गट-ड मधून गट-ड मध्ये पदोन्नतीने जाणाऱ्या रिक्त पदांची पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. त्यानुसार वरील संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे पात्रता तपासणी अभिप्रेत आहे.

त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या दि. १४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या आकृतीबंधानुसार मंजुर पदांपैकी पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे शासन धोरणानुसार भरण्याच्याद्दष्टीने महानगरपालिकेच्या दि. १५ जुन २०२३ रोजीच्या मंजुर सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२३ नुसार विविध संवर्गातील पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांची संपुर्ण तपशीलासह माहिती/पात्रता तपासणी करुन परिपुर्ण प्रस्ताव संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती समितीपुढे सादर करणे आवश्यक आहे.

त्यासाठी कर्मचारी यांच्या सेवेचा तपशील व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असून ज्या प्रकरणी संबंधीत कर्मचारी यांचेकडून वैयक्तिक कागदपत्रांची पुर्तता होणार नाही, अशा प्रकरणी संबंधीत कर्मचारी जबाबदार राहतील.

त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या दि. १ जानेवारी, २०२५ रोजीच्या सेवाजेष्ठता यादीनुसार विविध संवर्गातील संभाव्य उपलब्ध पदे पदोन्नतीने भरण्यासाठी गट-क मधून गट-क मध्ये व गट-ड मधून गट-क आणि गट-ड मधून गट-ड मध्ये पदोन्नतीने जाणाऱ्या खालील संवर्गाची पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील कर्मचारी यांची यादी तयार करण्यात आली आहे.

अ.नं.	संवर्ग	पदोन्नतीसाठी मंजुर पदसंख्या	पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील १:३ प्रमाणे पात्र पदसंख्या	विचारक्षेत्रातील यादीनुसार पदोन्नतीसाठी अंतिम संख्या
१	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक	२	५	२
२	अधिक्षक	३६	१७	१७
३	लघुलेखक निम्नश्रेणी (मराठी/इंग्रजी)	२	१	१
४	समाज सेवक	१	१	१
५	सहाय्यक विधि अधिकारी	२	५	२
६	सहाय्यक ग्रंथपाल	१	२	१
७	वरीष्ठ लिपिक	१४९	१५३	१४९
८	वरीष्ठ लिपिक (लेखा)	२७	१०	१०

Scanned with OKEN Scanner

अ.नं.	संवर्ग	पदोन्नतीसाठी मंजुर पदसंख्या	पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील १:३ प्रमाणे पात्र पदसंख्या	विचारक्षेत्रातील यादीनुसार पदोन्नतीसाठी अंतिम संख्या
९	लिपीक-टंकलेखक	४	१	१
१०	पंप चालक (पंप ऑपरेटर)	२	१	१
११	नाईक-चोपदार	४	१२	४
१२	मुकादम	२९	८७	२९
	एकूण	**२५९**	**२९५**	**२१८**

तरी गट-क मधून गट-क मध्ये व गट-ड मधून गट-क आणि गट-ड मधून गट-ड मध्ये पदोन्नतीने जाणाऱ्या संभाव्य उपलब्ध पदे पदोन्नतीने भरण्यासाठी पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील यादी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तसेच विचारक्षेत्रातील यादीमध्ये समावेश असलेल्या कर्मचारी यांची शैक्षणिक अर्हता व इतर कागदपत्रांची तपासणीसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रांची आवश्यकता आहे.

- सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या कालावधीचे गोपनीय अहवाल / वैयक्तिक नस्ती अहवाल.
- सन २०२४-२५ मधील मत्ता व दायित्व विवरणपत्रे
- परिविक्षाधीन कालावधी समाप्त आदेश
- शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे
- विभागीय परिक्षा उतीर्ण प्रमाणपत्र/सुट आदेश
- स्थायित्व प्रमाणपत्र
- ५०/५५ पुर्नविलोकन आदेश

पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील यादीमध्ये समाविष्ठ असणाऱ्या कर्मचारी यांचेपैकी ज्या कर्मचारी यांची विभागीय चौकशी सुरु आहे, त्यांचेबाबतीत संदर्भ क्र. ३, मुद्दा क्र. ७ मधील ७.८ नुसार ज्या कर्मचारी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी चालू आहे किंवा प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे अथवा शिक्षेच्या अमलाखाली आहे, अशा कर्मचाऱ्यांची माहिती समिती समोर सादर करण्यात येणार असून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तरी सोबत लगत केलेल्या यादीमधील पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील कर्मचारी यांनी पदोन्नतीसाठी आवश्यक असलेले वरीलप्रमाणे परिपुर्ण कागदपत्रे या कार्यालयाकडे गुरुवार दि. ११/०९/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करण्याचे आहेत.

(विनायक शिंदे)
सहाय्यक आयुक्त
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

टिप:- सदर पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील यादी नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र सांमिकु-२०२२/प्र.क्र. /८१/नवि-१९ दि. ३० मे २०२३ रोजीचा मंजुर सेवा (सेवाप्रवेश व सवांचे वर्गीकरण) नियमानुसार करण्यात आली आहे.

सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांनुसार पडताळणी करुन अंतिम निवड यादी तयार करण्यात येणार आहे. पदोन्नतीकरीता पात्र कर्मचारी यांची अंतिम निवड यादी पदोन्नती समितीसमोर सादर करण्यात येईल.

तदनंतर मंजुर सेवाप्रवेश नियम, प्रचलित शासन निर्णय, परिपत्रके यांच्या आधारे पदोन्नती समिती पदोन्नतीबाबत अंतिम निर्णय घेईल याची नोंद घ्यावी.

विचारक्षेत्रातील कर्मचारी यादी ही प्रशासकीय सोयीसाठी बनवलेली असून केवळ यादीतील नांव हे पदोन्नतीकरीता पात्रता समजण्यात येणार नाही व त्यानुसार कोणताही दावा करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रत जरुर त्या कार्यवाहीसाठी,

सर्व विभाग प्रमुख:- सदर परिपत्रक व विचार क्षेत्रातील यादी आपल्या अधिनस्त कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे.

तसेच सदर यादी महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर व मध्यवर्ती आस्थापना कार्यालय, सांगली या ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner